महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

==============================================================

जावक क्रमांक – ४०७०/६०　　　　　　　　　　　　　　दिनांक :- ११ ऑक्टोबर, २०२४

**प्रसिद्धिपत्रक**

# म्हाडा कोंकण मंडळातर्फे १२,६२६ सदनिकांच्या विक्रीसाठी अर्ज नोंदणी व भरणा प्रक्रियेला प्रारंभ

उपाध्यक्ष श्री. संजीव जयस्वाल यांच्या हस्ते सोडतीचा 'गो-लाइव्ह' समारंभ

मुंबई, दि. ११ ऑक्टोबर, २०२४ : म्हाडाच्या कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे ठाणे शहर व जिल्हा, कल्याण, टीटवाळा, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग मधील ओरस आणि वेंगुर्ला आणि मालवण येथील विविध गृहनिर्माण योजनेअंतर्गत १२,६२६ सदनिकांच्या विक्रीकरिता अर्ज नोंदणी व अर्ज भरणा प्रक्रियेचा शुभारंभ सोडतीचा 'गो-लाइव्ह' कार्यक्रमांतर्गत म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या हस्ते आज करण्यात आला.

म्हाडा मुख्यालयात आयोजित 'गो-लाइव्ह' कार्यक्रमांतर्गत श्री. संजीव जयस्वाल यांनी सांगितले की, नुकत्याच मुंबईतील पार पाडलेल्या सोडतीनंतर आज म्हाडाच्या कोंकण मंडळातर्फे १२,६२६ सदनिकांची सोडत जाहीर करण्यात येत आहे. मुंबईच्या शेजारील ठाणे, कल्याण, नवी मुंबई आणि विरार या शहरांमध्ये परवडणार्‍याच दरातील सदनिकांचा या सोडतीत प्रामुख्याने समावेश आहे. समाजातील शेवटच्या घटकाला हक्काचा निवारा मिळावा या उद्दिष्टांवर कार्यरत म्हाडाने कोंकण मंडळाच्या सोडतीच्या माध्यमातून १०४२८ घरे अत्यल्प उत्पन्न गटासाठी तर १९८१ घरे अल्प उत्पन्न गटासाठी तर मध्यम उत्पन्न गटासाठी ८५ सदनिका, उच्च उत्पन्न गटासाठी १३२ सदनिका विक्रीकरिता उपलब्ध केली आहेत. अधिकाधिक नागरिकांनी आपल्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी या सोडत प्रक्रियेत सहभाग घ्यावा. असे श्री. जयस्वाल यांनी सांगितले व कोंकण मंडळाच्या सोडत प्रक्रियेत सहभाग घेऊ इच्छिनाऱ्या अर्जदारांना शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी श्री. जयस्वाल यांनी नागरिकांना आवाहन केले की, म्हाडाच्या कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या सोडत प्रक्रियेत म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in व https://lottery.mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळावरूनच अर्ज नोंदणी, अर्ज भरणा करून सहभाग नोंदवायचा आहे. सोडत प्रक्रियेत सहभाग घेतेवेळी म्हाडाचे संकेतस्थळ अधिकृत असल्याची पडताळणी करूनच अर्ज नोंदणी करावी. तसेच अनामत रकमेव्यतिरिक्त सदनिकेची कोणतीही रक्कम म्हाडातर्फे आगाऊ घेतली जात नाही याबाबीची सर्वांनी दखल घ्यावी असे श्री जयस्वाल यांनी सूचित केले.

याप्रसंगी बोलतांना कोंकण मंडळाच्या मुख्य अधिकारी श्रीमती रेवती गायकर यांनी सोडतीत सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या अर्जदारांना आवाहन केले आहे की, सोडत प्रक्रिया पूर्णतः IHLMS 2.0 या संगणकीय प्रणालीच्या माध्यमातूनच राबविली जाणार आहे. ही प्रणाली संपूर्णतः ऑनलाईन व पारदर्शक असून यामध्ये कोणत्याही प्रकारे

मानवीय हस्तक्षेपास वाव नाही. IHLMS 2.0 ही संगणकीय सोडत प्रणाली ही संपूर्णतः ऑनलाईन व पारदर्शक असून यामध्ये कोणत्याही प्रकारे मानवीय हस्तक्षेपास वाव नाही. तसेच या सदनिकांच्या विक्रीकरिता किंवा तत्सम कोणत्याही कामासाठी कोणत्याही समाजमाध्यमांची, त्रयस्थांची, संस्थांची अथवा इतर मध्यस्थांची मदत घेण्यात आलेली नाही. मंडळाने कोणालाही प्रतिनिधी, सल्लागार व प्रॉपर्टी एजंट नेमलेले नाही. त्यामुळे अर्जदाराने कोणत्याही त्रयस्थ /दलाल/ मध्यस्थ व्यक्तीच्या प्रलोभनांना बळी पडू नये. तसेच अशा प्रकारच्या गैरव्यवहारास अथवा फसवणुकीस कोंकण मंडळ अथवा म्हाडा जबाबदार राहणार नाही. नागरिकांना असेही आवाहन करण्यात येत आहे की, त्यांची अशाप्रकारे कोणी व्यक्ति/ दलाल काही प्रलोभने देऊन फसवणूक करीत असल्याचे आढळल्यास त्यांनी 'म्हाडा'च्या मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी तसेच उपमुख्य अधिकारी (पणन) मुंबई मंडळ यांचे कार्यालयास कळवावे, असेही श्रीमती गायकर यांनी सांगितले.

कोंकण मंडळातर्फे जाहीर करण्यात आलेली ही सोडत दोन घटकांमध्ये विभागण्यात आली आहे. १२,६२६ सदनिकांपैकी ११,१८७ सदनिका प्रथम येणार्यारस प्रथम प्राधान्य या योजनेअंतर्गत विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत अत्यल्प उत्पन्न गटासाठी ९८८३ सदनिका, १५ टक्के एकात्मिक शहर योजनेअंतर्गत ५१२ सदनिका , २० टक्के सर्वसमावेशक योजनेअंतर्गत एकूण ६६१ सदनिका उपलब्ध असणार आहेत. कोंकण मंडळातर्फे उभारण्यात आलेल्या विखुरलेल्या १३१ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध आहेत. प्रथम येणार्याेस प्रथम प्राधान्य योजनेअंतर्गत अर्जदारांनी https://lottery.mhada.gov.in या संकेत स्थळावर नोंदणी करून इच्छित सदनिकेसाठी अर्ज भरावयाचा आहे. अर्ज भरतेवेळी अर्जदारांना केवळ आधार कार्ड आणि पॅन कार्ड प्रणालीमध्ये अपलोड करावयाचे आहे. तसेच आधार कार्डशी संलग्न असेला मोबाइल क्रमांक व पासपोर्ट साइज फोटो ऑनलाइन सादर करावयाचा आहे. नोंदणी प्रक्रियेनंतर अर्जदार इच्छित सदनिकेकरिता ऑनलाइन पेमेंट करू शकतील. प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेला सायंकाळी सहा वाजता यशस्वी अर्जदारांची यादी म्हाडाच्या संकेत स्थळावर जाहीर करण्यात येईल. प्रथम येणार्याेस प्रथम प्राधान्य ही योजना त्या त्या योजनेतील सदनिका उपलब्ध असे पर्यंतच कार्यरत राहील याची अर्जदारांनी नोंद घ्यावी.

तसेच दुसर्याी घटकामध्ये १४३९ सदनिकांचा समावेश आहे. यामध्ये २० टक्के सर्वसमावेशक योजनेअंतर्गत एकूण ५९४ सदनिका उपलब्ध असणार आहेत. कोंकण मंडळातर्फे उभारण्यात आलेल्या मागील सोडतीतील व इतर विखुरलेल्या ६०७ सदनिका आणि ११७ भूखंड विक्रीसाठी उपलब्ध आहेत. तसेच १२१ सदनिका पत्रकार प्रवर्गाकरिता आरक्षित आहेत. या सदनिकांकरीता अर्ज सादर करण्यासाठी अर्जदार IHLMS 2.0 ही सोडतीची संगणकीय आज्ञावली अर्जदार अँड्रॉइड (android) अथवा आयओएस (ios)या दोन्ही ऑपरेटिंग सिस्टिमच्या साहाय्याने आपल्या मोबाईलवर डाउनलोड करू शकतात. तसेच अर्जदारांच्या सोयीकरिता https://housing.mhada.gov.in या म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर अर्ज नोंदणी प्रक्रिया उपलब्ध करून देण्यात आली आहे. अर्जदारांना या संगणकीय प्रणालीची माहिती देणारी मार्गदर्शनपर माहितीपुस्तिका, ध्वनीचित्रफिती, हेल्प फाईल आणि हेल्प साईट या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे. या सोडतीत अर्जदार १० डिसेंबर, २०२४ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत सहभाग घेऊ शकतात. त्यानंतर सोडतीत सहभाग घेण्याची लिंक या प्रणालीवरून निष्क्रिय करण्यात येणार आहे. दिनांक ११ डिसेंबर, २०२४ रात्री ११.५९ पर्यंत अर्जदार अनामत रक्कमेचा भरणा ऑनलाईन करू शकतील, तसेच दिनांक ११ डिसेंबर, २०२४ रोजी संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत RTGS / NEFT द्वारे अनामत रकमेचा भरणा अर्जदारांना करता येईल. अशाप्रकारे सर्व कागदपत्रांची पूर्तता करणारे अर्जदार या प्रणालीद्वारे पात्र ठरविले जातील. सोडतीसाठी पात्र अर्जांची प्रारूप

यादी १८ डिसेंबर , २०२४ रोजी सायंकाळी ६.०० वाजता म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर दिनांक २० डिसेंबर , २०२४ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत अर्जदारांना प्रारूप यादीवर आपल्या दावे व हरकती नोंदविता येणार आहेत. अंतिमतः २४ डिसेंबर रोजी सोडतीत सहभाग घेणार्या अर्जांची यादी म्हाडाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. दिनांक २७ डिसेंबर , २०२४ रोजी सकाळी १० वाजता पात्र अर्जाची संगणकीय सोडत जाहीर केली जाणार आहे.

सोडत प्रणालीत अर्जदारांना अर्ज भरतेवेळी येणार्याज अडचणींवर मार्गदर्शन करण्यासाठी ०२२ – ६९४६८१०० हा हेल्पलाईन क्रमांक मंडळातर्फे उपलब्ध करवून देण्यात आला आहे.

यावेळी मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद शंभरकर, मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद बोरीकर, म्हाडाचे मुख्य अभियंता श्री. धिरजकुमार पंदिरकर, मुख्य अभियंता श्री. महेशकुमार जेस्वानी, मुख्य अभियंता श्री. शिवकुमार आडे, वित्त नियंत्रक श्री. अजयसिंह पवार, मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार श्री. प्रवीण साळुंखे, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्रीमती वैशाली गडपाले, विधी सल्लागार मृदुला परब, मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी श्रीमती सविता बोडके, उपमुख्य अधिकारी श्रीमती कल्पना पवार आदी उपस्थित होते.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा




---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**

Public Relations Department

Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==========================================================================

Outward No. – 4070/60 Dt. 11th October, 2024

**Press Release**

MHADA Konkan Board Opens Registration for the Sale of 12,626 Houses and 117 Plots

Lottery Launch Ceremony to be Inaugurated by MHADA Vice President Mr. Sanjeev Jaiswal

Mumbai, 11 October, 2024: The Konkan Housing and Area Development Board, a regional unit of MHADA, has commenced the registration and application process for the sale of 12,626 housing units under various housing schemes across Thane city and district, Kalyan, Titwala, Palghar, Raigad, Ratnagiri, and Sindhudurg's Oras, Vengurla, and Malvan. The Go-Live ceremony to mark the start of the lottery was inaugurated by MHADA Vice President and CEO Mr. Sanjeev Jaiswal.

During the 'Go-Live' event held at MHADA headquarters, Mr. Jaiswal stated that following the recently concluded Mumbai lottery, MHADA's Konkan Board is announcing the sale of 12,626 flats. These include affordable flats primarily in the neighboring cities of Thane, Kalyan, Navi Mumbai, and Virar. MHADA aims to provide shelter to the last segment of society. Through this lottery, MHADA has made 10,428 flats available for the economically weaker section, 1,981 flats for the low-income group, 85 flats for the middle-income group, and 132 flats for the high-income group. Mr. Jaiswal urged citizens to participate in this process to realize their dream of owning a home and extended his best wishes to the applicants.

Mr. Jaiswal further emphasized the transparency of the Konkan Board's computerized lottery system and urged prospective homebuyers to take full advantage of the opportunity to secure a home. He appealed the citizens on the occasion to register and apply only through MHADA's official websites: https://housing.mhada.gov.in and https://lottery.mhada.gov.in. He emphasized the importance of verifying the authenticity of the websites during registration. Additionally, MHADA does not collect any advance payments apart from the earnest money deposit.

Speaking at the event, Mrs. Revati Gaikar, Chief Officer of the Konkan Board, urged applicants to note that the lottery process will be conducted entirely through the computerized IHLMS 2.0 system, which is fully online and transparent with no scope for human intervention. She emphasized that MHADA has not appointed any representatives, consultants, or property agents for this process. Therefore, applicants should not fall prey to third-party offers or brokers. If anyone encounters fraudulent offers, they should report them to MHADA's Chief Vigilance and Security Officer or the Deputy Chief Officer (Marketing) of the Mumbai Board.

Meanwhile, The lottery announced by the Konkan Board is divided into two parts. Of the 12,626 flats, 11,187 are available under the 'first come, first served' scheme. These include 9,883 flats under the Pradhan Mantri Awas Yojana (PMAY) for the economically weaker section, 512 flats under the 15% Integrated City Scheme, and 661 flats under the 20% Inclusive Housing Scheme. Additionally, 131 scattered flats built by the Konkan Board are available for sale. Applicants must register on https://lottery.mhada.gov.in and apply for the desired flat. Applicants will need to upload their Aadhar and PAN cards along with a passport-sized photo and a mobile number linked to their Aadhar card. Payment can be made online after registration, and successful applicants will be announced on the 15th of every month at 6 PM on MHADA's website.

The second part includes 1,439 flats. Among these, 594 flats are available under the 20% Inclusive Housing Scheme, 607 scattered flats from previous lotteries, and 117 plots are available for sale. Additionally, 121 flats are reserved for the press category. Applicants can apply using the IHLMS 2.0 computerized system, accessible via Android and IOS devices. They can also register through MHADA's official website, where guidance materials such as brochures, help files, and videos are available.

The application deadline for this part of lottery is 10 December, 2024, until 11:59 PM. The earnest money deposit can be paid online until 11 December, 2024. A provisional list of eligible applicants will be published on 18 December, 2024, with the final list released on 24 December, 2024. The computerized lottery will be held on 27 December, 2024.

For assistance with the application process, the Konkan Board has provided a helpline number: 022 – 69468100.

The event was also attended by Mr. Milind Borikar, Chief Officer of the Mumbai Board, and Mr. Milind Shambharkar, Chief Officer of the Mumbai Building Repairs and Reconstruction Board.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer/MHADA

---

**Follow us on :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

